# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** प्रभाग क्र. २२, अंतर्गत कुणबीपुरा येथील रेणुका वाचनालयाची इमारत
**{सा.बां.वि.(डिपीडिसी) }** शिकस्त व जिर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने महानगरपालिका कुणबीपुरा येथील रेणुका वाचनालयाची इमारत तोडण्याच्या प्रसतावास मंजूरी मिळण्याकरीता सादर.

**टिप :-**

१. प्रभाग क्र. २२, अंतर्गत कुणबीपुरा येथील रेणुका वाचनालयाची इमारत शिकस्त व जिर्ण झालेली असून, सार्वजनिक सुरक्षितेच्या संभाव्य धोका टाळण्याच्या दृष्टीने तोडण्यात येत असून, त्याठिकाणी रेणुका वाचनालयाच्या जागेवर ई-लायब्ररी निर्माण करण्यात येत आहे.
२. सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट नस्तीत संलग्न आहे.
३. सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 67/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 13/06/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (डिपीडिसी), सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. २२, अंतर्गत कुणबीपुरा येथील रेणुका वाचनालयाची इमारत शिकस्त व जिर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने महानगरपालिका कुणबीपुरा येथील रेणुका वाचनालयाची इमारत तोडण्याच्या प्रसतावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.